## मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम.

## राष्ट्रीय सेवा योजना नियमित शिबीरांतर्गत

# मतदार नोंदणी व जागृती कार्यशाळा अहवाल

दि. 06सप्टें. 2018 स्थळ :– मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय,वाशिम.

---

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. ०६सप्टेंबर २०१८ रोजी मतदार जागृती कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य प्रा.जी.एस.कुबडे हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.व्ही.बी.चांदजकर, प्रा.डी. आर.दामोदर यांची उपस्थिती होती.

या प्रसंगी बोलतांना रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.डी.आर.दामोदर यांनी सदर कार्यशाळेच्या आयोजनाचा उद्देश स्पष्ट केला. प्रा.व्ही.बी.चांदजकर यांनी सर्वांना लोकशाही मध्ये सहभागी होता यावा व मतदानाच्या अधिकाराचे वापर करता यावा यासाठी मतदार नोंदणी करणे गरजेचे असल्याचे सांगितले. वयाची १८ वर्ष पूर्ण झालेल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मतदार नाव नोंदणी करावी व आपल्या परिसरातील इतरांनाही मतदान नोंदणीसाठी प्रवृत्त करण्याचेही आवाहन केले. याप्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी अर्ज वितरीत करण्यात आले. आपल्या अध्यक्षीय मनोगतातून कार्यकारी प्राचार्य प्रा.जी.एस.कुबडे यांनी रासेयो स्वयंसेवक हा मतदारदुत आहे व त्यानुसार विद्यार्थ्यांनी समाजातील जनसामान्य मतदारांना जागृत करून मतदानाचा टक्का कसा वाढवता येईल याविषयी सखोल असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अजय राजे यांनी केले तर आभार प्रदिप पट्टेबहादुर यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसह बहुसंख्या विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

N.S.S. Programme Office
Matoshri Shantabai Gote
College Washim

Officiating Principal
Matoshri Shantabai Goto Arts
Com. & Sci College,Washim




मतदार जागृती कार्यशाळेप्रसंगी मार्गदर्शन करतांना
प्रा. व्ही. बी. चोंदनकर




मतदार नोंदणीचे फॉर्म वितरीत झाल्यानंतरचे फोटो.

N.S.S. Programme Officer
Matoshri Shantabai Gote
College Washim

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com. & Sci College,Washim

सकाळ
शनिवार,
८ सप्टेंबर २०१८ | ४



वाशीम : मतदार नोंदणी करताना विद्यार्थी.

# गोटे महाविद्यालयात मतदार नोंदणी मागदर्शन कार्यशाळा

वाशीम, ता. ७ : स्थानिक मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाशीम येथे राष्ट्रीय सेवा योजना पथकच्या वतीने गुरूवारी (ता. ६ ) रोजी मतदार नोंदणी मागदर्शन कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेच्या अध्यक्ष्यस्थानी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. जी.एस.कुबडे हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.विकास चांदजकर हे होते. याप्रसंगी कार्यशाळेच्या प्रास्ताविकामध्ये रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. दीपक दामोदर यांनी सदर कार्यशाळेच्या आयोजनाचा उद्देश स्पष्ट केला. तसेच नव मतदारांनी मतदार यादीत नाव नोंदविण्याची प्रक्रिया समजावून सांगितली. आपल्या मार्गदर्शनमध्ये प्रा. विकास चांदजकर यांनी लोकशाही व मतदार यांच्यातील सहसंबंध स्पष्ट करतांना लोकशाही व्यवस्थेला मजबूत करण्यासाठी मतदार जागृत असणे आवश्यक असल्याचे सांगितले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. जी.एस.कुबडे यांनी नाव मतदार नोंदणी उपक्रमाचे कौतुक करतांना रासेयो च्या स्वयंसेवकांनी मतदार दूत म्हणून सामान्य मतदारांमध्ये जागृती करावी असे आवाहन केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मतदार नोंदणीचे फॉर्म वितरित करण्यात आले. याप्रसंगी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसह विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

N.S.S. Programme Office
Matoshri Shantabai Gote
College Washim

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com & Sci College, Washim